NES High School, Bhandup
I Preliminary Examination
Sub : Marathi
No. of Pages : 04

Date : 12-11-18 Marks : 50
Std. : X Div. ____ Time : Hrs.
Roll No. ____

प्र. १ अ) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

१) कृती पूर्ण करा. (०२)

अब्दुलच्या पेटीत असणा-या वांगडयांचे रंग

[ ] [ ] [ ] [ ]

“अब्बाजान आज मत जाओ ना तपोवनको.”

“क्यूं बेटे ?”

“जाने दे, जाने दे अन्वर. काही बोलून फायदा आहे का? आजचा दिवस म्हणजे तर त्यांच्यासाठी पर्वणीच ! एवढं काय आहे त्या तपोवनात कोण जाणे.” अब्दुलची बायको शन्नू नाराजीच्या सुरात आपल्या मुलाची समजूत काढत म्हणाली, “मी लवकर येईन बेटा.” आपल्या वडिलांचे हे बोलणे ऐकून अन्वर खेळायला निघून गेला. “आज शक्रांत. त्यात मंगळवार. कितीतरी बायका बांगडया भरायला आणि देवीच्या दर्शनाला येतील आणि आपलं दुकान बंद. रघुभैयाचा धंदा तेजीत चालणार आज आणि उदया लगेच नवीन वस्तू येईल रघुभैयाच्या घरात आणि तुम्ही? तुम्ही जाऊन बसा त्या तपोवनात.” “शन्नू, चूप बैठ अभी.”

एका हातात बांगडयांची पेटी आणि एका हातात पिशवी घेऊन अब्दुलने पायांत चपला सरकवल्या. “हे बघा, रस्त्यानं कोणी भेटलं तर सांगू नका तपोवनात जातो म्हणून. धंदयावर परिणाम होता त्याचा. समजलं?”

अब्दुलने एकवार तिच्याकडे बघितले. तिच्या डोळयांतला क्रोध त्याच्या परिचयाचा होता; पण तिच्याकडे बघून आज त्याला तिचा राग आला नाही, तर कीव आली. अब्दुल बसटॉपवर आला. अनेक ठिकाणी उसवलेल्या स्वेटरमधून थंडी चांगलीच जाणवत होती. बस आली. बांगडयांची पेटी आणि पिशवी सांभाळत अब्दुल बसमध्ये चढला. अगदी खिडकीजवळ बसला. पेटी अलगद उचलून त्याने आपल्या मांडीवर ठेवली. गर्दीत कुणाचा धक्का लागला तर..... लाल, हिरव्या, निळया, रंगीबेरंगी बांगडयांकडे मोठया कौतुकाने त्याने बघितले. बस सुरू होताच थंडगार वा-याचा झोत अधिकच त्रासदायक वाटू लागला. अब्दुलने मफलर कानाला घट्ट लपेटून घेतला. जिल्हाधिकारी कचेरीजवळ पाऊण बस रिकामी झाली. तपोवनाकडे कोण जातोय कशाला? जेमतेम पाच-सहाच उतारू राहिले बसमध्ये.

Scanned by CamScanner

तपोवनाच्या त्या गोलाकार कमानीकडे अब्दुलचे लक्ष गेले. त्या सहा महिन्यात केवढी फुलली आहे तिच्यावरती वेल. मागे आलो तेव्हा जेमतेम हातभर होती. अब्दुल गेटजवळ आला आणि लहान लहान मुलींनी एकदम गलका करायला सुरवात केली.

२) गदयांशाच्या आधारे वाक्य पूर्ण करा. (०२)

१. स्वेटरमधून अब्दुलला चांगलीच थंडी जाणवत होती कारण ......

२. लहान लहान मुलींनी एकदम गलका करायला सुरवात केली कारण...

३) व्याकरण

१. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे अव्यय ओळखून प्रकार लिहा. (०१)

१) अब्दुल गेटजवळ आला आणि लहान लहान मुलींनी गलका करायला सुरवात केली.

२) अब्दुल बसस्टॉपवर आला.


२. विरूद्धार्थी शब्द लिहा. (०१)

१) रिकामी २) घट्ट

४) स्वमत (०२)

शन्नोच्या वागण्यामधील तिचा विचार काय असावा याविषयी तुमचे मत लिहा.

प्र.१ आ) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (०२)




अभिषेकनं दार उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या. आल्या आल्या त्यांनी किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणा-या भांडयांकडे आपला मोर्चा वळवला. अभिषेकला आज उठायला उशीरच झाला होता. काल त्यांच्याकडे सुमित आला होता कानपूरहून सुमित म्हणजे अभिषेकचा आतेभाऊ. तो आय.आय.टी. कानपूरला शिकत होता. काल संध्याकाळी सुमित आल्यापासून गप्पांसोबत सुमितच्या लॅपटॉपवर त्यानं केलेले नवे प्रोजेक्ट अभिषेक पाहत होता. त्यामुळे रात्री झोपायला दोन वाजले. "काय हो हे, तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता?" हॉलमधून स्नेहलचा आवाज आला. अभिषेक हॉलमध्ये आला तर रेखामावशी फरशी पुसत होत्या; पण मागे त्यांच्या पायाचे काळे मळकट ठसे पुसलेल्या फरशीवर उमटले होते. स्वच्छतेची भोक्ती असलेली स्नेहल त्यामुळे त्रासली होती. रेखामावशीही विचा-या वरमल्या होत्या. "अवो, स्नेहाताई,

मी कुठं [illegible]त बसून शान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागते! आनं आमच्या वस्तीचा रस्ता बी समदा उखणलाय समदी धूळ लागती पायास्नी. आन धा-धा मिन्टाला हातपाय धोयाला येल बी नाय आन पानी तरी कुठे हाय बक्कळ?"

२) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (०२)

१. हॉलमध्ये रेखामावशी कोणते काम करत होत्या ?

२. अभिषेक सुमितच्या लॅपटॉपवर काय पाहत होता?

३) व्याकरण

१. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे प्रत्यय ओळखून विभक्तीचा प्रकार लिहा. (०१)

१) सुमित <u>कानपूरहून</u> आला होता.

~~२) स्नेहल <u>स्वच्छतेची</u> भोक्ती होती.~~

२. विरूद्धार्थी शब्द लिहा. (०१)

१) लवकर २) आनंदी

४) स्वमत (०२)

स्वच्छतेवद्दलचे तुमचे विचार लिहा.

प्र.२ अ) १) 'अग्निमाजि पडे बाळू। माता धावे कनवाळू (०२)

तैसा धावे माझिया काजा। अंकिला मी दास तुझा'

या ओळींतील तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

२) 'जसा विचार तसा दृष्टांत' हा संत एकनाथांच्या काव्याचा (०२)

विशेष आहे हे 'योगी सर्वकाल सुखदाता' या कवितेच्या आधारे स्पष्ट करा.

प्र.३ स्थूलवाचन (०३)

१) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत असे तुम्हाला वाटते?

किंवा

२) कवितेतील सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

प्र.४ व्याकरणकृती (भाषाभ्यास)

१) समास (०२)

खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

१. पंधरवडा २. रामश्याम

२) खालील ओळींतील अलंकार ओळखून लिहा. (०२)

सन्मार्ग आणि सन्मती लाभो सदा सत्संगती

नीती ना ही भ्रष्ट हो जरी संकटे आली किती

Scanned by CamScanner

३) वाक्यरूपांतर (०२)

दिलेल्या सूचनेप्रमाणे वाक्य रूपांतरित करा.

१. केवढी उंच इमारत ही ! (विधानार्थी करा)

२. तू चित्र काढावे. (वाक्य आज्ञार्थी करा)

४) सामान्यरूप

खालील शब्दांचे सामान्यरूप लिहा. (०२)

१) देऊळ २) पक्षी

५) वाक्प्रचार

खालील वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा. (०२)

| | |
|---|---|
| १) रममाण होणे | १. स्तुतीने हुरळून जाणे |
| २) भान ठेवणे | २. जाणीव ठेवणे |
| | ३. मग्न होणे |

आ) भाषासौंदर्य

१) शब्द संपत्ती

१. समानार्थी शब्द लिहा. (०१)

१) वृक्ष २) आभाळ

२. विरुद्धार्थी शब्द लिहा. (०१)

१) वर २) आत

२) शब्दसमुहाबद्दल एक शब्द (०१)

१. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला

३) एका शब्दाचे अनेक अर्थ लिहा. ← खरी → (०१)

४) लेखननियमांनुसार

१. आमचे मुळ गाव दक्षीण गोव्यातील माशेल (०१)

५) विरामचिन्हे

खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे बदला. (०१)

१. 'तू नहीं खायेगी? '

खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करा. (०१)

काका हे एक शास्त्रीय सत्य आहे.

६) पारिभाषिक शब्द (०२)

१. Absence २. Drama

७) खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द तयार करा. (०१)

जवळपास

प्र.५ निबंधलेखन (कोणताही एक) (०७)

१. मी वृक्ष बोलतोय २. मी अनुभवलेली एक रम्य पहाट

Scanned by CamScanner